महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई ४०० ०१९
email : recruitment4msedcl@gmail.com website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०१३५०५ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/सेप्र/जा.क्र.०५-२०१९/२६०९४ दिनांक : ०३/१०/२०२२

## तातडीचे

प्रति,
१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या.,प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/कल्याण.
२) प्रादेशिक कार्यकारी संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे/नागपूर.
३) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., सर्व परिमंडळ कार्यालये,

**विषय :** जाहिरात क्र. ०५/२०१९ अन्वये ईडब्ल्यूएस प्रवर्गातून "उपकेंद्र सहाय्यक" पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीबाबत.

**संदर्भ :** १) पत्र क्र. मासंवि/सेप्र/जा.क्र.०५-२०१९/१२२०४ दि. ०६/०७/२०२०
२) पत्र क्र. मासंवि/सेप्र/जा.क्र.०५-२०१९/२००२४ दि. २५/११/२०२०
३) पत्र क्र. मासंवि/सेप्र/जा.क्र.०५-२०१९/२३७४९ दि. ३१/१२/२०२०
४) पत्र क्र. मासंवि/सेप्र/F-२०२१००२३२८/२०२१/जा.क्र.०५-२०१९/४७९७ दि.२६/०२/२०२१
५) पत्र क्र. मासंवि/सेप्र/जा.क्र.०५-२०१९/५२३३ दि. ०३/०३/२०२१

..................

महावितरण कंपनीमध्ये "उपकेंद्र सहाय्यक" या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरीता सेवायोजन जाहिरात क्र. ०५/२०१९ ही माहे जुलै २०१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरूपाची ऑनलाईन क्षमता चाचणी दि. २५/०८/२०१९ रोजी घेण्यात येऊन उमेदवारांची निवड यादी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तद्नंतर निवड झालेल्या उमेदवारांची (एस.ई.बी.सी प्रवर्ग वगळून) कागदपत्र पडताळणी दि. ०१-०२/१२/२०२० व दि. २९-३०/१२/२०२० रोजी मंडल स्तरावर करण्यात आली होती. याबाबत कागदपत्र पडताळणीबाबतच्या स्वंयस्पष्ट सूचना उक्त संदर्भीय पत्रांन्वये देण्यात आल्या होत्या.

२. मा. उच्च न्यायालय मुंबई, येथील याचिका क्र. ५१९६/२०२१ संदर्भात मा. न्यायालयाने दिलेला आदेश तसेच या संदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायिक प्रकरणामधील आदेशाच्या अनुषंगाने ई.डब्ल्यु.एस. प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबत पुढील आदेशापर्यंत कार्यवाही न करण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या.

३. ई.डब्ल्यु.एस. प्रवर्गातून "उपकेंद्र सहाय्यक" पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणी व नियुक्तीबाबतच्या माहिती/सुचना कंपनीच्या संकेतस्थळावर दि. ०३/१०/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

४. **दि. ०३/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतील उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नोंदी/अर्हता संबंधितांच्या प्रमाणपत्रांची छानणी/ पडताळणी दि. ०६/१०/२०२२ ते दि. १३/१०/२०२२ या कालावधीत त्यांना वर्ग केलेल्या संबंधित मंडळ स्तरावर करण्यात यावी. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीनंतर पात्र उमेदवारांना त्याच दिवशी नियुक्ती पत्र निर्गमीत करण्याची कार्यवाही करावी.**

५.	निवड झालेल्या उमेदवारांची जाहिरातीमधील नमूद शैक्षणिक अर्हता, वय, अटी व शर्ती तसेच सांघिक कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या नोंदी संबंधातील दस्तऐवज/कागदपत्रे छानणी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील अशा उमेदवारांना "उपकेंद्र सहाय्यक" पदावर नियुक्ती द्यावी.

६.	**सदर भरती प्रक्रिया ही मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल याचिका (डायरी नं.)२९१७४/२०२२ व या संदर्भात विविध न्यायालयात असलेली प्रलंबित याचिका, औद्योगिक कामगार न्यायालय, याचिका क्र. ४८/२०१२ व मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका क्र. ५७०१/२०२०, क्र. ५७०३/२०२०, क्र. २००५/२०२२, तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठामध्ये दाखल झालेल्या याचिका क्र. ७०३८/२०१८, क्र. ५३१०/२०१९ व क्र. ५४२/२०१८ तसेच** इतर अन्य मुद्यांच्या संदर्भात विविध न्यायालयात/न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील आदेशाच्या/ अंतिम न्याय निर्णयाच्या तसेच शासन निर्णयात उद्‌भवणाऱ्या भविष्यातील न्यायालयीन प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

७.	कागदपत्रे पडताळणी/निवड पत्र/नियुक्ती इ.बाबत सांघिक कार्यालयाकडून वेळोवेळी सुधारीत करण्यात आलेल्या तरतुदी व निर्गमीत केलेल्या सुचना/आदेश यामध्ये अनियमीतता होणार नाही याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. तसेच कागदपत्रे पडताळणी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांच्या तपशीलासह (उमेदवारांचे नाव, रजिस्ट्रेशन नंबर) हजर, गैरहजर, पात्र, अपात्र इ. सविस्तर माहिती **recruitment4msedcl@gmail.com** या ई-मेल पत्त्यावर त्वरीत पाठविण्यात यावी.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(अरविंद भादीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**<u>प्रत सविनय सादर :-</u>**

संचालक, (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

**प्रत रवाना :-**

१) मुख्य महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (तां.आस्था.), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
--- जाहिरात क्र. ०६/२०१९ व अंतर्गत अधिसूचना ०१/२०१९ अंतर्गत ईडब्ल्यूएस प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीकरिता.
३) महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
४) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.